दाखल दिनांक : २७/०६/२०१७
नोंदणी दिनांक : २७/०६/२०१७
निकाल दिनांक : १३/११/२०१७
कालावधी : ००व.०४म.१७दि.

मे. तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१, बारामती, जिल्हा पुणे.
(श्री अ. म. राजकारणे यांचेसमोर)

किरकोळ सिव्हील अर्ज क्रमांक ४३/२०१७ निशाणी क्रमांक

१. चि श्रीधर ब्रम्हदेव बेलदार
तर्फे अ.पा.क. आई :
श्रीमती वर्षा ब्रम्हदेव बेलदार
वय ३० वर्षे, धंदा – शेती/ घरकाम,
रा. तांदूळवाडी, ता, बारामती,
जिल्हा पुणे.

२. चि. सौरभ ब्रम्हदेव बेलदार
तर्फे अ.पा.क. आई :
श्रीमती संगिता ब्रम्हदेव बेलदार
वय ३२ वर्षे, धंदा – शेती/ घरकाम,
रा. तांदूळवाडी, ता, बारामती,
जिल्हा पुणे. ... अर्जदार

विरूध्द

कोणी नाही ...जाबदेणार

वकीलपक्ष :

अर्जदारतर्फे वकील श्री एस. एस. वाघ.

**न्यायनिर्णय**
**(दिनांक १३/११/२०१७)**

प्रस्तुत अर्ज अर्जदार क्र. १ यांनी, त्यांची अ.पा.क्र. आई नामे सौ वर्षा ब्रम्हदेव बेलदार व अर्जदार क्र. २ यांनी, त्यांची अ.पा.क्र. आई नामे श्रीमती संगिता ब्रम्हदेव बेलदार यांचेमार्फत दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे —

२. अर्जदार क्र. १ आणि २ शिक्षण घेत आहेत. शेतजमीन मौजे तांदूळवाडी, ता. बारामती, जिल्हा पुणे येथील गट क्र. १७८ मधील ७२ आर. क्षेत्रापैकी प्रत्येकी ३० आर. क्षेत्र अर्जदार क्र. १ आणि २ यांच्या मालकीचे आहे. सदरहू जमीन जिरायत स्वरुपाची असल्याने ती कसणे, बागायत करणे अर्जदार यांना शक्य होत नाही. त्यामुळे त्यांचे नावावरील सदरहू ६० आर. जमीन विक्री करुन आलेल्या पैशाचा वापर अर्जदार क्र. १ व २ यांच्या शिक्षणासाठी व भविष्यासाठी त्यांचे नावे नवीन बागायत शेतजमीन खरेदी करणे आहे.

तसेच सदरहू ६० आर. शेतजमीन विकण्याचा अर्जदार यांचा विक्रीचा व्यवहार श्री जय नानासाो पाटील यांचेशी ठरलेला आहे व तशी विसार पावती नोटरी ऑफीसर, बारामती यांचे समोर दि. ५.५.२०१७ रोजी दस्त क्र. ८४१/२०१७ अन्वये करुन दिलेला आहे. तरी, सदरहू ६० आर. क्षेत्र त्यांचे अ.पा.क. आईमार्फत विकण्याची परवानगी अर्जदाराने मे. न्यायालयाकडून मिळणेकामी अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

३. सदरहू अर्जाबाबत स्थानिक 'लोकमत' वृत्तपत्रात दि. २१.५.२०१७ रोजी जाहीर नोटीस देण्यात आली, सदरहू नोटीस नि. क्र ६ वर दाखल आहे, परंतु प्रस्तुत अर्जावर आजपावेतो कोणीही हरकत घेतली नाही, त्यामुळे अर्जदाराचा अर्ज एकतर्फा चालविण्याचा हुकूम करण्यात आला. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज विनाआव्हानीत राहिल्याने अर्जदाराचे म्हणणे जशेच्या तसे मान्य करण्यास कोणतीही अडचण नाही.

४. अर्जदारांची मालकी हक्काची शेतजमीन ६० आर. क्षेत्र विकणे कामी करार दि. ५.५.२०१७ रोजी झाला असून सदरहू विक्री करार रु. ५०,००,०००/— (अक्षरी रुपये पन्नास लाख फक्त) वर निश्चित झाला. त्यापैकी रक्कम रु. १०,००,०००/— (अक्षरी रुपये दहा लाख फक्त) कराराचे वेळी त्यांनी घेतलेली आहे आणि उर्वरित रक्कम रु. ४०,००,०००/— (अक्षरी रुपये चाळीस लाख फक्त) दोन वर्षांनंतर खरेदीखताचे वेळी घ्यावयाची आहे. त्यामुळे सदरहू व्यवहार पारदर्शी स्वरुपाचा असून व साधारणतः प्रचलित दरानुसार ठरला असल्याने संशयास्पद वाटत नाही. तसेच त्यांनी सदरहू विसारपावतीच्या वेळी २० टक्के अनामत रक्कम घेतली असून बाकीची

रक्कम करारात ठरल्याप्रमाणे स्विकारायची आहे आणि सदरहू रकमेतून नवीन बागायती शेतजमीन खरेदी करुन ती अज्ञान मुलांच्या भविष्यासाठी घेणे आहे, त्यामुळे अर्जदारांचा प्रामाणिकपणा सुध्दा दिसून येतो.

५. या ठिकाणी नमूद करण्यासारखे आहे की, त्यांच्याजवळ वरील ६० आर. क्षेत्र वगळता १२ आर क्षेत्र शिल्लक राहणारच आहे. अर्जदारांची अ.पा.क. आई नामे श्रीमती वर्षा ब्रम्हदेव बेलदार हिने आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि. क्र. ९ अन्वये दाखल केले आहे तसेच श्रीमती संगिता ब्रम्हदेव बेलदार हिने आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि. क्र. १० अन्वये दाखल केले आहे. या सर्व बाबींचा विचार करता, अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यास कोणतीच अडचण नाही.

६. अर्जदार क्र. १ हा १४ वर्षांचा आहे आणि अर्जदार क्र. २ हा १५ वर्षांचा आहे. त्यामुळे त्यांना साधारण ३ ते ४ वर्षे सज्ञान होण्यासाठी आहे. या आधि सदरहू जमीनीच्या व्यवहारातील रक्कम रुपये १०,००,०००/— (अक्षरी रुपये दहा लाख फक्त) त्यांना मिळालेली आहे, त्यापैकी दोनही अर्जदारांना प्रत्येकी रु. ५,००,०००/— (अक्षरी रुपये पाच लाख फक्त) त्यांच्या शिक्षणासाठी पुरेशी आहे. त्यामुळे सदरहू व्यवहारातील उर्वरित रक्कम रुपये ४०,००,०००/— (अक्षरी रुपये चाळीस लाख फक्त) असून त्यापैकी दोनही अर्जदारांना प्रत्येकी रुपये २०,००,०००/— (अक्षरी रुपये वीस लाख फक्त) ही कोणत्याही सोईच्या राष्ट्रीयकृत बॅंकेमध्ये मुदत ठेव योजनेत ठेवण्यात यावी व सदरहू मुदत ठेवेची पावती त्यांनी एक महिन्यांनी न्यायालयात सादर करावी.

तरी, या सर्व बाबीं विचारात घेता, अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो :

## <u>आदेश</u>

१) प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) अर्जदारांची अ.पा.क. आई यांनी शेतजमीनीच्या विक्रीतील उर्वरित रक्कम रु. ४०,००,०००/— (अक्षरी रुपये चाळीस लाख फक्त) पैकी प्रत्येकी रक्कम रु. २०,००,०००/— (अक्षरी रुपये वीस लाख फक्त) प्रत्येकी अज्ञान अर्जदार

क्र. १ व २ यांचे नावावर कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेत मुदत ठेव योजनेत ठेवण्यात यावी व सदरहू मुदत ठेवेची पावती त्यांनी एक महिन्यांनी न्यायालयात सादर करावी.

३) अर्जदाराची आई हिने अर्जदार यांचे हिताविरुध्द कोणतेही कृत्य करु नये व तसे शपथपत्र न्यायालयात दाखल करावे.

XXX

बारामती. (अ. म. राजकारणे)

दि. १३.११.२०१७ तदर्थ जिल्हा न्यायाधीश—१, बारामती, जिल्हा पुणे

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment are same word for word as per original Judgment.

Name of the Steno : Mrs. V.S. Sonawadekar (HG)
Name of the Court : A.M.Rajkarne,
Asst. Sessions Judge, Pune.
Date : 13.11.2017
Judgment signed by Presiding Officer on : 7.12.2017
Judgment uploaded on : 11.12.2017